# पिंपरी चिंचवड महानगरपालिका , पिंपरी – ४११ ०१८.

वैद्यकीय विभाग, मुख्य कार्यालय

दुरध्वनी क्र. ०२०६७३३३३३३ **E-mail – medical@pcmcindia.gov.in**

## -: जाहीरात :-

**थेट मुलाखत ( WALK IN INTERVIEW )**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील वैदयकिय विभागाचे अंतर्गत असणारे नविन थेरगाव रुग्णालय , नविन जिजामाता रुग्णालय , ह.भ.प मल्हारराव कुटे रुग्णालय,आकुर्डी व नविन भोसरी रुग्णालय , तालेरा रुग्णालय , यमुनानगर रुग्णालय व सांगवी रुग्णालय व इतर ठिकाणी कामकाजाकरीता पात्र व इच्छुक तज्ञ वैदयकिय अधिका-यांची एकत्रीत मानधन तत्वावर ११ महिने कालावधीसाठी पुर्णत: तात्पुरत्या स्वरुपात महापालिकेच्या रुग्णालयात विविध विभागाकरिता आवश्यकते नुसार मानसेवी तज्ञ / विशेष तज्ञ वैदयकिय अधिकारी यांची नियुक्ती करण्यासाठी **दिनांक १३/०७/२०२२ ते दिनांक- १५/०७/२०२२** अखेर सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० तसेच त्यापुढील प्रत्येक सोमवारी उपलब्ध जागानुसार खालील पदासाठी थेट मुलाखती (**walk in interview** ) आयोजीत करण्यात आलेल्या आहेत. तरी पात्र व इच्छुक तज्ञ वैदयकिय अधिका-यांनी मुलाखतीस उपस्थीत रहावे.

| अ.क्र | तपशिल | शैक्षणिक अर्हता | **कामकाजा कालावधी** | **मासिक मानधन / ठोक वेतन र.रु.** |
|---|---|---|---|---|
| १ | मनपाच्या रुग्णालयातील विविध विभागाकरिता मानसेवी तज्ञ / विशेष तज्ञ वैदयकिय अधिकारी यांची नियुक्ती करणेबाबत | १. तज्ञ वैदयकीय अधिकारी यांना पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच ३ वर्षे कामकाजाचा अनुभव असणे आवश्यक आहे. | ११ महिने | रक्कम रुपये २००००/- |

**टिप - उमेदवारांच्या उपलब्धतेनुसार कामाचा अनुभव अट शिथिल करणेत येईल.**

<u>अर्ज स्विकारणे विषयक माहिती</u>

- **अर्ज स्विकारण्याचे ठिकाण – वैदयकीय विभाग प्रमुख यांचे कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, दुसरा मजला , वैदयकीय विभाग मुख्य कार्यालय, पिंपरी-१८**
- **walk in interview साठी उपस्थीतीची वेळ १३/०७/२०२२ ते दिनांक- १५/०७/२०२२ अखेर सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यत तसेच तेथुन पुढे दरसोमवारी walk in interview पद्धतीने सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यत राहिल.**

<u>अटी –शर्ती</u>

१) मानसेवी तज्ञांनी रुग्णालयात उपलब्ध असणारे तज्ञ वैदयकीय अधिकारी, वैदयकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या समवेत काम करावयाचे असुन रुग्णालयास लागु असणारे सर्व नियम मानसेवी तज्ञावर बंधनकारक राहतील

२) मानसेवी रुग्णालयातील रुग्णांना वैदयकीय सेवा उपलब्ध करुन देणे तसेच आंतररुग्णाना उपचार करणेसंबधील आवश्यक असलेला वेळ द्यावा लागेल.

३) मानसेवी तज्ञांना आठवड्यातुन किमान २ दिवस तसेच रुग्णालयांचे आवश्यकतेनुसार काम करावे लागेल.

४) रुग्णालयात संबधित शाखेतील युनिटवर नेमणुक केलेल्या नियंत्रण अधिका-यांचे नियंत्रण राहतील

५) मानसेवी म्हणुन करणेत आलेली नियुक्ती हि विहीत केलेले रुग्णालय व आवश्यकतेनुसार इतर रुग्णालयात राहील. सदर नियुक्ती नमुद करण्यास आलेल्या कालावधीसाठी करण्यात आलेली असली तरी मानसेवी तज्ञाकडुन रुग्णालयात कामकाजात अडचणी आणणे, अधिकारांचा गैरवापर करणे व अन्य गैरप्रकार घडल्यास अथवा कामकाजात टाळाटाळ केल्यास नियुक्तीच्या कालावधीत केव्हाही सेवा समाप्त करण्यात येईल.

६) मानसेवी तज्ञांनी रुग्णालयातील रुग्णांना रुग्णालयातच सेवा देणे बंधनकारक राहिल. तसेच सदर रुग्णांना अन्य कोणत्याही खाजगी दवाखान्यात औषधोपचारासाठी पाठविता येणार नाही.

७) नेमणुकीचे संदर्भात मानसेवी तज्ञांनी दिलेली माहिती खोटी आहे असे निदर्शनास आल्यास व तशी खात्री पटल्यास कोणत्याही प्रकारची चौकशी न करता अथवा तत्सम नोटीस न बजावता महापालिकेच्या रुग्णालयातच मानसेवी तज्ञ पदावर दिलेली नियुक्ती रद्द करणेत येईल व त्याबाबत कोर्टात दाद मागता येणार नाही.

८) निवड झालेल्या उमेदवारांनी विहीत नमुन्यात कॉन्ट्रॅक्ट कारारनामा करुन दिल्यानंतर कंत्राटी पद्धतीने नेमणुक दिली जाईल.

९) मुलाखतीसाठी येणा-या उमेदवारांना स्वर्चाने मुलाखतीसाठी उपस्थीत रहावे लागेल.

१०)वरिल पदे ही संपुर्णपणे कंत्राटी स्वरुपाची असल्याने या पदावर कायम स्वरुपाची नियुक्ती मागण्याचा हक्क असणार नाही.

११)वरिल पदासाठी कामाचे स्वरुप ठरविण्याचे सर्वस्वी अधिकार वैदयकिय विभाग प्रमुखांना राहतील.

१२)अपात्र ठरविलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. बोलविलेल्या उमेदवारांस नियुक्ती देण्याबाबतचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांनी स्वत:कडे राखुन ठेवलेले आहेत या बाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

१३)महापालिकेच्या अस्थापनेवरील नियमीत कर्मचा-याच्या लाभदायी योजना कंत्राटी कर्मचा-यांना लागु होणार नाही.

१४)निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हता धारण न करणार आढळल्यास ,गैरवर्तन करताना आढळल्यास , सेवा देण्यास टाळाटाळ केल्यास , रुग्णालयाची वेळ न पाळल्यास व दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी आपोआप रद्द होईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

१५)नियुक्ती संदर्भात अंतिम अधिकारी आयुक्त ,पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी १८ यांना राहतील आणि निवड/नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर, कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार त्यांनी राखुन ठेवले आहे.

१६) सदर जाहिरात पिंपरी चिंचवड महानगरपालिका नोटीस बोर्ड आणि www.pcmcindia.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असुन सदरहु भरती प्रक्रिया संदर्भात अधिक माहिती नमुद संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**सही/-**
**(राजेश पाटील)**
**आयुक्त**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी ४११ ०१८**

**जाहिरात क्रमांक – १०६**
**दिनांक - ३०/०६/२०२२**
**जा.क्र -वैदय/३/कावि/४५९ /२०२२**
**दिनांक - ३०/०६/२०२२**